उच्चदाब वितरण प्रणाली योजने अंतर्गत कृषीपंपाना वीज जोडणी देण्यासाठी विहित मर्यादेपेक्षा अधिक खर्च येणाऱ्या कृषीपंप अर्जदारांना सौर कृषीपंप वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१९/प्र.क्र.८०/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १८ जून, २०१९

<u>संदर्भ</u> : १. शासन निर्णय क्रमांक: उविप्र-२०१८/प्र.क्र. ३०/ऊर्जा-५ दिनांक : ५ मे, २०१८.

२. शासन निर्णय क्रमांक: सौरप्र-२०१८/प्र.क्र.४०१/ऊर्जा-७ दिनांक : १५ नोव्हेंबर, २०१८.

३. महावितरण कंपनीचे पत्र क्र.संचालक(प्रकल्प)/महावितरण/एचव्हीडीएस/ १४०७० दिनांक २१.०५.२०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्यातील दिनांक ३१.०३.२०१८ अखेर पैसे भरुन वीज जोडणीकरिता महावितरण कंपनीकडे प्रलंबित असलेल्या २,२४,७८५ संभाव्य कृषीपंपाना उच्चदाब वितरण प्रणालीव्दारे वीज जोडणी देण्याकरिता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. याकरिता महावितरण कंपनीने राज्यभर निविदा प्रक्रिया राबवून दिनांक १६.१०.२०१८ पासून सदर योजनेची अंमलबजावणी सुरु केली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणीत महावितरण कंपनीस येणाऱ्या अडचणींबाबत महावितरण कंपनीने संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये शासनाकडून मार्गदर्शन अपेक्षिले आहे. याबाबत शासन स्तरावर विचारविनिमय करण्यात येऊन शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतले आहेत.

<u>शासन निर्णय</u> :-

१. सद्यस्थितीत उच्चदाब वितरण प्रणाली योजनेमध्ये कृषीपंपाना वीजजोडणी देण्यासाठी रुपये २.५ लाख इतक्या खर्चाची मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. या मर्यादेपेक्षा जास्त खर्च येणाऱ्या कृषीपंप अर्जदारांना रुपये २.५ लाखाच्या मर्यादेत ३ एचपी डीसी व ५ एचपी डीसी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देण्यात यावेत. अशा अर्जदारांशी महावितरण कंपनीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी चर्चा करुन सौर कृषीपंप घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त करावे. याकरिता आवश्यकतेनूसार कमाल ३०,००० सौर कृषीपंप घेण्यात यावेत. त्यासाठी संमती दर्शविलेल्या अर्जदाराकडून, मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजनेच्या धर्तीवर, सर्वसाधारण वर्गवारीतील

लाभार्थ्यांकडून कृषीपंपाच्या रक्कमेच्या १० टक्के व अनुसूचित जाती / जमाती वर्गवारीतील लाभार्थ्यांकडून ५ टक्के इतके लाभार्थी अंशदान घेण्यात यावे.

२. ज्या अर्जदारांना वीज जोडणी देण्याकरिता रुपये २.५ लाखापेक्षा जास्त खर्च येत असेल. परंतु त्यांनी सौर कृषीपंप घेण्यास संमती दर्शविली नाही, अशा अर्जदारांकरिता पायाभूत विद्युत सुविधा उपलब्ध करण्यासाठी अतिरिक्त निधी जिल्हा नियोजन विकास समिती अंतर्गत अथवा इतर योजनांमधून महावितरण कंपनीने उपलब्ध करुन घ्यावा. तसेच असा अतिरिक्त खर्च अर्जदार स्वत: करावयास तयार असल्यास त्याच्याकडून निधी प्राप्त करुन घेऊन त्यास वीज जोडणी उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. दिनांक ३१.०३.२०१८ नंतर संभाव्य अर्जदारांकडून कृषीपंप वीज जोडणीच्या मागणीबाबत अर्ज स्विकारण्यात यावेत. संबंधित अर्जदारास सौर कृषीपंप व पारंपारिक वीज जोडणी घेण्याचा पर्याय ठेवण्यात यावा. सदर अर्जाची वरील निकषानूसार तांत्रिक छाननी करण्यात येऊन जे अर्जदार अशा निकषात बसत असतील त्यांची अर्जात दिलेल्या पर्यायानुसार स्वतंत्र यादी तयार करण्यात यावी. निकषात न बसणाऱ्या अर्जदारा समवेत प्रथम चर्चा करुन त्यास सौर कृषीपंप घेण्यास प्रवृत्त करावे व त्यांना "मुख्यमंत्री सौर कृषीपंप" योजनेतून सौर कृषीपंप उपलब्ध करुन द्यावेत.

४. दिनांक ३१.०३.२०१८ नंतर कृषीपंप अर्जाची मागणी सुरु केल्यानंतर सन २०१९-२० या वर्षापर्यंत नवीन कृषीपंपासाठी वीज जोडणीचे अर्ज विचारात घेऊन नवीन संभाव्य ग्राहकांसाठी स्वतंत्र प्रस्ताव शासनास सादर करावा.

५. "महावितरण आपल्या दारी" या योजनेत विद्युत पायाभूत सुविधा न उभारता वीज जोडणी देण्यात आलेल्या कृषी ग्राहकांकरिता उच्चदाब वितरण प्रणालीवर वीजजोडणी देण्याकरिता विद्यूत पायाभूत सुविधा उभारणीबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव शासनास सादर करावा.

२. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०६१९१०५६५६७११० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c1327133a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5dbac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2019.06.19 10:56:12 +05'30'

(प्रशांत पुं.बडगेरी)
शासनाचे उप सचिव

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. मा.मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. उर्वरित सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
८. अप्पर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (व्यय), मंत्रालय, मुंबई
१०.सर्व मंत्रालयीन विभाग
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा)महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ०२०.
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१३.अधिदान व लेखा अधिकारी, (अराप/रालेवि-१), मुंबई
१४.अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई
१५.निवासी लेखाधिकारी, अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
१६.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१७.सर्व जिल्हाधिकारी
१८. वित्त विभाग (अर्थसं/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९.अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२०.कक्ष अधिकारी (ऊर्जा-५), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१.सर्व कार्यासने (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२२.निवडनस्ती- ऊर्जा-५.